

श्री.जयदिप डाकरे सर



श्री.प्रविण डाकरे सर

# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

इयत्ता – चौथी (31 जुलै) माझा अभ्यास

Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

# दिवस एकतीस : ☞ CLICK HERE



टेस्ट सोडवा

# वाचा व कथा तयार करा.

## ५. मला शिकायचंय !

### आम्ही कथा लिहितो – १

खालील मुद्द्यांच्या आधारे कथा पूर्ण करा. यातली गंमत म्हणजे प्रत्येकाला स्वतःच्या मनासारखी कथा तयार करता येईल. कथा तयार करा आणि वर्गात सगळ्यांना ऐकवा. तयार केलेल्या कथेला शीर्षक द्या.

**मुद्दे :** घनदाट जंगल – वाघ आणि त्याचं पिल्लू – पिल्लू बोलत नाही – बोलायला शिकवण्यासाठी मांजरीची नेमणूक – म्याँव, म्याँव शिकवण्याचा प्रयत्न – वाघोबा वैतागतो – आता शिकवायला गाढवदादा येतात – ते खिंकाळायला सुरुवात करतात – पुन्हा वाघोबाचा वैताग आणि पिल्लू हैराण – तिसऱ्या वेळी बैलाची नेमणूक – वाघोबाचा वैताग वाढतो – एक दिवस पिल्लू जंगलात फिरते – दबा धरून बसलेला शिकारी – पिल्लावर बंदुकीचा नेम धरतो – पिल्लू डरकाळी – शिकारी धूम ठोकतो – वाघोबा खूश.



**शिक्षकांसाठी :** वरील मुद्दे विद्यार्थ्यांकडून स्वतंत्रपणे वाचून घ्यावे. त्यांआधारे गोष्ट लिहायला सांगावी. वर्गात प्रत्येकाकडून गोष्ट वाचून घ्यावी. विद्यार्थ्यांना वरील चित्रांच्या आधारे आणखी एखादी गोष्ट तयार करण्यास प्रोत्साहन द्यावे.

लगतची मागची व पुढची संख्या लिहा. **२. संख्याज्ञान**

टेस्ट सोडवा

ताई : दोन्ही गटांतील संख्या नीट पाहा. त्यात कोणता फरक लक्षात येतो ?

रेश्मा : ४, ६, ८ या संख्यांना २ नं भागलं, तर बाकी उरत नाही आणि ५ व ९ ला २ नं भागलं तर बाकी १ उरते.

ताई : ज्या संख्यांना २ नं भागल्यावर बाकी उरत नाही, त्यांना सम संख्या म्हणतात.
४, ६, ८ या सम संख्या आहेत.
ज्या संख्यांना २ नं भागल्यावर बाकी १ उरते, त्यांना विषम संख्या म्हणतात.
५ व ९ या विषम संख्या आहेत.

◆ खालील संख्यांएवढ्या वस्तू (खडे, मणी इ.) घेऊन दोन–दोनचे गट करून सम संख्या व विषम संख्या ठरवा.

१२, ११, १०, २३, २७, ३४, २५, ३६, ३९, ४१, ४५, ५२, १६, १७, १९, २८

- सम संख्यांच्या गटात लिहिलेल्या संख्यांचे एककस्थानचे अंक लिहा.
- विषम संख्यांच्या गटात लिहिलेल्या संख्यांचे एककस्थानचे अंक लिहा.

◆ समसंख्येच्या/विषमसंख्येच्या एककस्थानी नेहमी कोणते अंक येतात ते पाहा.

समसंख्येच्या एककस्थानचे अंक : ०, २, ४, ६, ८
विषमसंख्येच्या एककस्थानचे अंक : १, ३, ५, ७, ९

◆ एककस्थानचे अंक पाहून दिलेली संख्या सम आहे की विषम ते ठरवा.

३५, ६७, ३२, ३०, ४३, ३४, ५१, ५६, ८८, ७९

### आंतरराष्ट्रीय संख्याचिन्हे

सुरेश : ए विजया, सकाळी एक गोष्ट माझ्या लक्षात आली. आपल्याकडच्या सगळ्या नोटांवर छापलेल्या संख्या इंग्रजीत असतात.

विजया : खरंच की ! पण असं का रे ? आपण तर संख्या वेगळ्या प्रकारानं लिहितो.

सुरेश : मलाही तोच प्रश्न पडलाय. चल, आपण ताईंना विचारू.
ताई, सगळ्या नोटांवरच्या संख्या इंग्रजीतच का असतात ?

विजया : आणि बहुतेक सगळ्या वाहनांवरचे नंबरही.

ताई : छान ! आधी तुमच्या निरीक्षणाबद्दल तुम्हांला शाबासकी देते. मला आधी सांगा, तुमच्यापैकी कोणी आपला महाराष्ट्र सोडून दुसरीकडे गेला होतात का ?

विजया : हो ताई. आम्ही कर्नाटकात गेलो होतो.

ताई : तिथल्या दुकानांच्या पाट्या तुला वाचता आल्या का ?

विजया : नाही.

ताई : त्या आपल्याला वाचता येत नाहीत, कारण त्यांची अक्षरं लिहिण्याची पद्धत वेगळी असते. तसंच त्यांची अंक लिहिण्याची पद्धतही वेगळी असते.

Write the numbers just before and after.

## 1. Number Work

टेस्ट सोडवा

**Tai** : Look carefully at the numbers in the two groups. What difference do you notice in them?

**Reshma** : If we divide 4, 6, 8 by 2, there is no remainder. But, when we divide 5 or 9 by 2, the remainder is 1.

**Tai** : The numbers which leave no remainder when we divide them by 2 are called even numbers. 4, 6 and 8 are even numbers.
Numbers that leave a remainder of 1 when divided by two are called odd numbers. 5 and 9 are odd numbers.

- **Take as many objects (stones, beads, etc.) as each of the following given numbers in turn. By putting the objects in twos, decide whether the number is even or odd.**
  12, 11, 10, 23, 27, 34, 25, 36, 39, 41, 45, 52, 16, 17, 19, 28

- Write down the digits in the units place of the even numbers.
- Write down the digits in the units place of the odd numbers.

- **Digits in the units place of even and odd numbers**
  Digits in the units place of even numbers : 0, 2, 4, 6 or 8.
  Digits in the units place of odd numbers : 1, 3, 5, 7 or 9.

- **See the digits in the units place and say whether the number is even or odd.**
  35, 67, 32, 30, 43, 34, 51, 56, 88, 79

### International numerals

**Suresh** : Hey, Vijaya, have you noticed? All the numbers printed on our currency notes are in English.

**Vijaya** : Yes, that's true! What did you think they would be?

**Suresh** : Well, I thought, in Maharashtra, they would be in Marathi. Come let's ask Tai about this. Tai, why are all the numbers printed on our currency notes in English and not in Marathi?

**Vijaya** : And mostly all the numbers on our vehicles, too?

**Tai** : Very good! Excellent observation! Now tell me, have any of you travelled outside Maharashtra?

**Vijaya** : Yes, Tai, we have been to Karnataka.

**Tai** : Could you read the names of shops on their sign boards?

**Vijaya** : No, I couldn't.

**Tai** : That's because they write letters using a different script.
Their numerals are also different from ours.


टेस्ट सोडवा

## Listen and understand. Revision

**Action Words and Phrases**

**Listen, read and speak.**
ऐका, वाचा आणि बोला.

**Teacher :**
Form pairs.
Select one word from each basket at a time and make meaningful sentences.
Then present at least ten sentences.
For example, 'Run around.'




मुलांच्या जोड्या करून शब्दकार्डांच्या मदतीने हा खेळ घ्यावा.

**Teacher :**
Form groups of four.
Choose one word from each tower and make meaningful sentences.
Write the words on big sheets of paper and show your sentences to the class.

| | | | |
|---|---|---|---|
| I | found | a | pencil. |
| We | saw | an | pencils. |
| You | got | some | orange. |
| He | ate | a few | oranges. |
| She | took | many | tiger. |
| It | gave | | tigers. |
| They | | | |

या कृतींचा सराव झाल्यानंतर मुलांना स्वतःच्या मनाचे शब्द घालून वाक्ये तयार करण्यास प्रोत्साहन द्यावे.

**हे मला येते.**

- इंग्रजीतून तोंडी दिलेल्या सोप्या सूचना समजतात. ☐
- या युनिटमधील कविता हावभावांसह म्हणता येतात. ☐
- इंग्रजीतील काही संवाद सहजतेने करता येतात. ☐
- इंग्रजीतील सर्व कॅपिटल व स्मॉल अक्षरे (a-z) ओळखता, वाचता येतात. ☐ लिहिता येतात. ☐
- इंग्रजीतील काही छोटे शब्द पाहून तसेच स्वतःच्या मनाने लिहिता येतात. ☐
- यापूर्वी शिकलेली इंग्रजी वाक्ये, कवितांच्या ओळी आठवून सांगता येतात. ☐
- स्वतःबद्दल इंग्रजीतून ३-४ वाक्ये सांगता येतात. ☐
- इंग्रजीतील छोटी, सोपी वाक्ये वाचता येतात. ☐ बोलता येतात. ☐ तयार करता येतात. ☐
- थोड्या सरावानंतर इंग्रजी नाटकात भाग घेता येतो. ☐

टेस्ट सोडवा

पाठ वाचा व स्वाध्याय सोडवा सराव करा.



**पाणपोई**

घराबाहेर पडलेल्या लोकांना तहान लागल्यावर पिण्यासाठी पाणी लागते. यासाठी काही ठिकाणी रांजण अथवा माठ पाण्याने भरून पाणी पिण्याची सोय केली जाते, ती पाणपोई होय. पाणपोईच्या पाण्यासाठी मोबदला घेतला जात नाही. काही व्यक्ती किंवा संस्था अशा पाणपोई सुरू करतात. त्यामुळे लोकांची पिण्याच्या पाण्याची सोय होते. विशेषतः उन्हाळ्यात पाणपोईचा खूप उपयोग होतो.

### माहीत आहे का तुम्हांला

**छत्रपती शिवाजी महाराजांनी दुर्ग (किल्ले) उभारताना पुढील सूचना केल्या –**

''गडावर आधी उदक (पाणी) पाहून किल्ला बांधावा. पाणी नाही आणि तें स्थळ तो आवश्यक बांधणे प्राप्त झाले तरी आधी खडक फोडून तळी बांधावी.'' ''गडावरी झराही आहे, जसें तसें पाणीही पुरतें, म्हणून तितकियावरची निश्चिंती न मानावी...,'' ''याकरिता तसे जागी जाखिरियाचे (साठवलेले) पाणी म्हणून दोन चार तळी बांधावी. त्यातील पाणी खर्च होऊं न द्यावे, गडाचे पाणी बहुत जतन करावे...''

### आपण काय शिकलो

* पाणी साठवण्याच्या पारंपरिक पद्धती.
* पाणी साठवण्याच्या सध्याच्या पद्धती.
* पाण्याचा काटकसरीने वापर.

### हे नेहमी लक्षात ठेवा

पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. तिचा वापर सर्वच सजीव करतात. याचे भान ठेवून पाण्याचा वापर केला पाहिजे.

### स्वाध्याय

**(अ) थोडक्यात उत्तरे द्या.**

(१) पाणी कशासाठी साठवायचे ?
(२) पारंपरिक पद्धतीत घरात पाणी कसे साठवत असत ?
(३) धरण कशावर बांधतात ?
(४) पाण्याचा वापर करताना कोणती काळजी घ्यावी ?
(५) पाण्याचे प्रदूषण म्हणजे काय ?

**(आ) पाणीटंचाई असलेल्या भागात पाणी कसे साठवता येईल, याचा विचार करा. त्यासाठी काय करता येईल ते सूचवा.**

**(इ) पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी कोणत्या चांगल्या सवयी आपण स्वत:ला लावून घ्याव्यात ?**

***

# ४. शिवरायांचे बालपण

## वाचा व समजून घ्या. सराव

टेस्ट सोडवा

रक्षणाची जबाबदारी त्यांनी स्वीकारली. तेव्हा शहाजीराजांनी जिजाबाईंना शिवनेरीवर ठेवले व ते मुघलांवर चालून गेले.

.... आणि तो सोन्याचा दिवस उजाडला. फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ म्हणजेच इंग्रजी वर्षाप्रमाणे १९ फेब्रुवारी १६३०. शिवनेरीच्या नगारखान्यात सनई, चौघडा वाजत होता. अशा मंगल क्षणी जिजाबाईंच्या पोटी पुत्र जन्मला. किल्ल्यावर आनंदीआनंद झाला. बाळाचे बारसे झाले. शिवनेरी किल्ल्यावर जन्म झाला म्हणून बाळाचे नाव 'शिवाजी' ठेवले.

**शिवरायांचे बालपण :** शिवरायांच्या वयाची पहिली सहा वर्षे फार धावपळीत गेली; पण या धावपळीतही जिजाबाईंनी शिवरायांना उत्तम शिक्षण दिले. सायंकाळी त्या सांजवात लावत. शिवबांना जवळ घेत, मायेने कुरवाळत, त्यांना रामाच्या नि कृष्णाच्या, भीमाच्या नि अभिमन्यूच्या गोष्टी सांगत. तसेच कधी नामदेवांचे, कधी ज्ञानेश्वरांचे तर कधी एकनाथांचे अभंग म्हणून दाखवत. शिवरायांना शूर पुरुषांच्या गोष्टी आवडत. मोठे झाल्यावर त्यांच्यासारखे पराक्रम करावे असे त्यांना वाटे. जिजाबाई साधुसंतांच्या चरित्रांतील गोष्टीही सांगत. त्यातून त्यांच्या ठिकाणी साधुसंतांविषयी आदरबुद्धी निर्माण झाली.

गरीब मावळ्यांची मुले शिवरायांबरोबर खेळायला येत. कधीकधी शिवबाही त्यांच्या झोपडीत जात. त्यांची कांदाभाकर आवडीने खात. त्यांच्याशी गमतीदार खेळ खेळत. मावळ्यांची मुले म्हणजे जणू रानातील पाखरे ! ती पोपट, कोकीळ, वाघ यांचे हुबेहूब आवाज काढत. मातीचे हत्ती व घोडे बनवणे, मातीचे किल्ले



वीरमाता जिजाबाई शिवरायांना गोष्टी सांगताना

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here